सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८

( दिनांक २ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित )

## Maharashtra Act No. XX of 1999

# THE MAHARASHTRA REGULATION OF MARRIAGE BUREAUS AND REGISTRATION OF MARRIAGES ACT, 1998

*(As modified upto 2nd November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[Price : Rs. 4-00]

# महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | विवाह मंडळे आणि विवाह यांच्या निबंधकाची नियुक्ती. | १ |
| ४. | विवाह मंडळे व विवाह यांची नोंदणी करणे. | २ |
| ५. | विवाह मंडळाची नोंदणी. | २ |
| ६. | विवाह नोंदणीसाठी ज्ञापन सादर करण्याची पतीची जबाबदारी. | ३ |
| ७. | नोंदणी करण्यास नकार देण्याचा आणि महानिबंधकाकडे कळविण्याचा अधिकार. | ३ |
| ८. | महानिबंधकाचे अपीलविषयक अधिकार. | ४ |
| ९. | कलम ८ खालील आदेशाविरुद्ध अपील. | ४ |
| १०. | नोंदणी न केल्यामुळे विवाह बेकायदेशीर ठरणे. | ४ |
| ११. | विवाह नोंदणी प्रमाणपत्राची पडताळणी करण्याची मालक, इत्यादींची जबाबदारी. | ४ |
| १२. | कलम ६ च्या किंवा इतर कोणत्याही कलमांच्या तरतुदींचे पालन करण्याबाबत हयगय करण्याबद्दल किंवा ज्ञापनामध्ये खोटी विधाने करण्याबद्दल शास्ती. | ५ |
| १३. | खटला भरण्यास मंजुरी. | ५ |
| १४. | नोंदवही लोकांना पाहण्यासाठी खुली असणे आणि उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती देणे. | ५ |
| १५. | पक्षकार अज्ञान असेल त्याबाबतीत विवाहाची नोंदणी. | ५ |
| १६. | निबंधकाने नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत महानिबंधकाकडे पाठविणे. | ५ |
| १७. | निबंधक लोकसेवक असणे. | ५ |
| १८. | या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण. | ६ |
| १९. | नियम करण्याचा अधिकार. | ६ |
| २०. | व्यावृत्ती. | ७ |
| २१. | निरसन. | ७ |
| २२. | निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ७ |
| २३. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | ७ |

# सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

## महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १५ एप्रिल, १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात विवाह मंडळांचे विनियमन करून विवाहविषयक गैरव्यवहारांना आणि विवाह नोंदणी सुविधेच्या गैरवापराला प्रतिबंध करण्याकरिता आणि विवाहांची नोंदणी सक्तीची करण्याकरिता आणि तत्संबंधातील किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी एका सर्वसमावेशक व कडक कायद्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यामध्ये विवाह मंडळांचे विनियमन करून विवाहविषयक गैरव्यवहारांना आणि विवाह नोंदणी सुविधेच्या गैरवापराला प्रतिबंध करण्याकरिता आणि विवाहांची नोंदणी सक्तीची करणे आणि तत्संबंधातील किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी एक सर्वसमावेशक व कडक कायदा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,-- व्याख्या.

(क) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग;

(ख) "विवाह" या संज्ञेत पुनर्विवाहाचा समावेश होतो.

(ग) "विवाह मंडळ" किंवा "मंडळ" या संज्ञेचा अर्थ, विवाहासाठी इच्छुक असणाऱ्या व ज्यांनी मंडळात आपले नाव नोंदविले आहे अशा अविवाहित व्यक्ती, घटस्फोटित व्यक्ती, विधवा आणि विधुर यांना सुयोग्य जोडीदार मिळवून देण्यासाठी, अशा व्यक्तींना एकत्र आणणे, इत्यादी प्रकारची मदत करण्याचे कार्य करणारी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह यांनी मिळून बनलेले आणि कलम ५ अन्वये नोंदणी करण्यात आलेले मंडळ किंवा संस्था, असा आहे ;

(घ) "ज्ञापन" या संज्ञेचा अर्थ, कलम ६ मध्ये उल्लेख केलेले विवाह नोंदणी ज्ञापन, असा आहे ;

(ङ) "पक्षकार" या संज्ञेचा अर्थ, ज्यांचा विवाह झाला आहे असे पती आणि पत्नी, असा आहे ;

(च) "विहित" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(छ) "विवाहांची नोंदवही" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये ठेवलेली विवाहांची नोंदवही, असा आहे ;

(ज) "विवाह मंडळाची नोंदवही" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये ठेवण्यात आलेली विवाह मंडळाची नोंदवही, असा आहे ;

(झ) "निबंधक" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नियुक्ती करण्यात आलेला, विवाह मंडळे आणि विवाह यांचा निबंधक, असा आहे ;

१८८६ चा ६. (ञ) "महानिबंधक" या संज्ञेचा अर्थ, जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६ या अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता नियुक्त केलेला, जन्म, मृत्यू व विवाहाच्या नोंदणीसंबंधीचा महानिबंधक, असा आहे.

**३.** (१) राज्य शासनास, त्याला आवश्यक वाटेल एवढ्या व्यक्तींची, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांसाठी विवाह मंडळ व विवाह यांचे निबंधक म्हणून नियुक्ती करता येईल. विवाह मंडळे व विवाह यांच्या निबंधकाची नियुक्ती.

(२) निबंधक, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील आणि तो, महानिबंधकाच्या आणि शासनाच्या सर्वसाधारण निरीक्षण आणि नियंत्रणाखाली काम पाहील.

विवाह मंडळे व विवाह यांची नोंदणी करणे.

४. हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून राज्यातील प्रत्येक विवाह मंडळाची व प्रत्येक विवाहाची, विवाह मंडळ व विवाह नोंदणी निबंधकाकडे नोंदणी करण्यात येईल.

विवाह मंडळाची नोंदणी.

५. (१) विवाह मंडळ चालवू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट, अशा विवाह मंडळाच्या नोंदणीकरिता विहित करण्यात येईल अशा रितीने व अशा फी व कागदपत्रांसह, निबंधकाकडे अर्ज करील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेली विवाह मंडळे अशा प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत नोंदणीकरिता अर्ज करतील.

(२) निबंधक, पोट-कलम (१) खालील अर्ज प्राप्त झाल्यानंतर अशा अर्जाची छाननी व विहित दस्तऐवजाची पडताळणी करून अशा विवाह मंडळाची नोंदणी करील आणि विहित नमुन्यात अशा मंडळाला नोंदणी प्रमाणपत्र देईल. असे नोंदणी प्रमाणपत्र, मंडळ आपल्या नोंदणीकृत कार्यालयाच्या जागेत ठळक ठिकाणी लावील.

(३) नोंदणीसाठी करण्यात आलेला एखादा अर्ज विहित रीतीने करण्यात आला नसेल किंवा विहित आवश्यकतांनुसार नसेल तर, निबंधक, त्या अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अशा विवाह मंडळाची नोंदणी करण्याचे नाकारू शकेल व त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील.

(४) असे प्रत्येक विवाह मंडळ, असे प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून दर दोन वर्षांनी नवीकरणाची विहित फी देऊन आपल्या नोंदणीचे नवीकरण करील आणि निबंधक, नोंदणी करण्यासंबंधी, पोट-कलम (२) खाली घालून दिलेल्या रीतीनेच प्रमाणपत्राचे नवीकरण करील.

(५) कोणतेही विवाह मंडळ, विवाह मंडळ म्हणून असलेले आपले काम, पोट-कलम (२) खाली देण्यात आलेल्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले आपले नोंदणीकृत कार्यालय किंवा जागा याव्यतिरिक्त अन्यत्र करणार नाही.

(६) प्रत्येक विवाह मंडळ, असे मंडळ म्हणून असलेली आपली कामे, पोट-कलम (२) खाली दिलेल्या नोंदणीच्या अटी आणि शर्तीप्रमाणे काटेकोरपणे पार पाडील; आणि या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा ज्या अटी व शर्तीवर नोंदणी मंजूर करण्यात आली असेल त्यांचे मंडळाने उल्लंघन केल्यास किंवा पालन न केल्यास अशा मंडळाची नोंदणी रद्द केली जाण्यास पात्र ठरेल व तो एक अपराध देखील ठरेल आणि मंडळ, कलम १२ च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र ठरेल :

परंतु, कोणत्याही मंडळाची नोंदणी संबंधित मंडळाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय रद्द केली जाणार नाही.

(७) नोंदणीस अथवा नोंदणीच्या नवीकरणास नकार देण्यासंबंधीच्या किंवा केलेली नोंदणी रद्द करण्यासंबंधीच्या निबंधकाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा मंडळास, अशा आदेशाविरुद्ध विहित रीतीने महानिबंधकाकडे अपील करता येईल आणि अशा अपिलास, विवाह नोंदणीस नकार देणाऱ्या आदेशाविरुद्ध करावयाच्या अपिलांशी संबंधित कलमे ७, ८ आणि ९ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

६. (१) (क) विवाह झाल्यानंतर, त्या विवाहाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत विहित नमुन्यात विवाह नोंदणीचे ज्ञापन, ज्याच्या अधिकारितेत पती सर्वसाधारणपणे राहत असेल किंवा पक्षकारांपैकी एकजण सर्वसाधारणपणे राहत असेल, त्या निबंधकासमोर प्रस्तुत करणे ही पतीची पहिली जबाबदारी राहील ; विवाह नोंदणीसाठी ज्ञापन सादर करण्याची पतीची जबाबदारी.

(ख) विवाहातील पक्षकार आणि तीन साक्षीदार निबंधकासमोर व्यक्तीशः उपस्थित राहतील आणि ज्ञापनावर सही करतील ;

(ग) ज्ञापनासोबत, विहित कण्यात येईल अशी फी व इतर कागदपत्रे देण्यात येतील ;

(घ) ज्याच्यासमोर ज्ञापन प्रस्तुत केले असेल तो निबंधक विहित रीतीने पक्षकार व साक्षीदारांच्या ओळखीसंबंधी पडताळणी केल्यानंतर विवाहाच्या नोंदवहीत, त्या विवाहाची नोंदणी करील.

(ङ) विवाह नोंदणीनंतर निबंधक पक्षकारांना विहित नमुन्यात विवाह नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट कालमर्यादेत नोंदणी न केलेल्या कोणत्याही विवाहाची नोंदणी, पक्षकार सर्वसाधारणपणे ज्याच्या अधिकारितेत राहत असतील, त्या निबंधकाकडून, विवाहाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये, विवाह ज्ञापन आणि विहित करण्यात येईल अशी शंभर रुपयांहून अधिक नसणारी शास्ती सादर केल्यानंतर करण्यात येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये नोंदणी न केलेल्या कोणत्याही विवाहाची नोंदणी, कलम १२, पोट-कलम (१) च्या तरतुदीस अधीन राहून, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कोणत्याही वेळी, विहित करण्यात येईल अशी परंतु पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी, शास्ती आकारल्यानंतर करता येईल ;

(३) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी झालेल्या आणि तो झाल्यापासून एक वर्षापेक्षा कमी नसेल एवढा काळ लोटलेल्या आणि कोणत्याही कारणामुळे नोंदणी करण्यात न आलेल्या विवाहाची नोंदणी, विवाहाचे ज्ञापन आणि शंभर रुपये शास्ती सादर केल्यानंतर या कलमातील कोणत्याही तरतुदी शिथिल करून, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी एका वर्षात झालेला कोणताही विवाह, शंभर रुपये शास्ती दिल्यानंतर, पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार नोंदण्यात येईल.

७. (१) कलम ६ अन्वये ज्याच्याकडे ज्ञापन प्रस्तुत करण्यात आले आहे त्या निबंधकाची ज्ञापनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या छाननीनंतर किंवा त्याच्या निदर्शनास आलेल्या किंवा निदर्शनास आणून देण्यात आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे,-- नोंदणी करण्यास नकार देण्याचा आणि महानिबंधकाकडे कळविण्याचा अधिकार.

(क) पक्षकारांचा विवाह पक्षकारांच्या वैयक्तिक कायद्यानुसार लावण्यात आलेला नाही ; किंवा

(ख) पक्षकारांची किंवा साक्षीदारांची किंवा पक्षकारांची ओळख देणाऱ्या व्यक्तींची ओळख आणि विवाह झाला आहे हे वाजवीरित्या संशयातीत असल्याचे सिद्ध होत नाही ; किंवा

(ग) त्याच्यासमोर देण्यात आलेल्या कागदपत्रांवरून पक्षकारांची विवाहविषयक स्थिती सिद्ध होत नाही ;

यासंबंधी खात्री झाली किंवा तसे मानण्यास त्याला कारण असेल त्या बाबतीत--

तो, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि नोंदणी नाकारण्यासंबंधीची कारणे नमूद करून त्या विवाहाची नोंदणी करण्यास नकार देऊ शकेल आणि,--

(एक) पक्षकारांची किंवा साक्षीदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा त्याच्याकडे प्रस्तुत केलेल्या माहितीचा किंवा कागदपत्रांचा बिनचूकपणा सिद्ध करण्यासाठी आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती किंवा कागदपत्रे प्रस्तुत करण्यास पक्षकारांना फर्मावू शकेल आणि त्या प्रयोजनासाठी उभयपक्षी ठरविण्यात येईल अशा इतर कोणत्याही दिनांकास त्यांच्या समक्ष अशी आवश्यक माहिती व कागदपत्रे घेऊन उपस्थित होण्यास सांगू शकेल; किंवा

(दोन) आवश्यक वाटल्यास ती कागदपत्रे, ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत पक्षकार राहतात त्या पोलीस ठाण्याकडे, पडताळणीसाठी देखील पाठवू शकेल, आणि उभयपक्षी ठरविण्यात येईल अशा इतर कोणत्याही दिनांकास उपस्थित राहण्यास पक्षकारांना सांगू शकेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आणखी पडताळणी केल्यानंतर विवाह नोंदणीस कोणतीही हरकत नाही अशी निबंधकाची खात्री होईल त्या बाबतीत, तो त्या विवाहाची नोंदणी करू शकेल; आणि जर निबंधकाच्या मते नोंदणीच्या दृष्टीने तो विवाह योग्य नसेल तर, तो नोंदणी नाकारण्यासंबंधी लेखी आदेश, अशा नाकारण्यासंबंधीची कारणे नमूद करून काढू शकेल आणि नंतर ती बाब सर्व संबद्ध अभिलेखांसह आणि त्यासंबंधीच्या त्याच्या अहवालासह नाकारण्यासंबंधीच्या तशा आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीत महानिबंधकाकडे विचारार्थ पाठवू शकेल.

महानिबंधकाचे अपीलविषयक अधिकार.

८. निबंधकाकडून, कलम ७ अन्वये निर्देश मिळाल्यानंतर महानिबंधक, असा अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, लेखी स्वरूपात कारण नोंदवून एकतर विवाहाची नोंदणी करण्यासंबंधी निबंधकास सूचना देणारा किंवा विवाहाची नोंदणी नाकारण्याविषयीचा निबंधकाचा आदेश कायम करणारा आदेश काढील.

कलम ८ खालील आदेशाविरुद्ध अपील.

९. महानिबंधकाने कलम ८ अन्वये या अधिनियमाखाली विवाहाची नोंदणी नाकारण्यासंबंधी काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली व्यक्ती किंवा पक्षकार, असा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीत, अशा आदेशाविरुद्ध, ज्याच्या स्थानिक हद्दीतील अधिकारितेत हे विवाह निबंधकाचे कार्यालय असेल, त्या जिल्हा न्यायालयाकडे अपील करू शकेल, आणि अशा अपिलावर जिल्हा न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम राहील आणि ज्याच्यापुढे कलम ६ अन्वये ज्ञापन सादर केले होते, तो विवाह निबंधक अशा निर्णयास अनुरूप अशी कार्यवाही करील.

नोंदणी न केल्यामुळे विवाह बेकायदेशीर न ठरणे.

१०. कलम ९ च्या तरतुदीस अधीन राहून, ज्याला हा अधिनियम लागू होतो, असा कोणताही विवाह, केवळ या अधिनियमाखाली त्याची नोंदणी करण्यात आली नाही एवढ्या कारणावरून बेकायदेशीर ठरणार नाही.

विवाह नोंदणी प्रमाणपत्राची पडताळणी करण्याची मालक, इत्यादींची जबाबदारी.

११. कोणत्याही कर्मचाऱ्याने, किंवा यथास्थिति, अर्जदाराने, या अधिनियमाच्या कलम ६ खाली दिलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर केल्याखेरीज,--कोणताही मालक, किंवा शासकीय किंवा निम-शासकीय प्राधिकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा स्थानिक प्राधिकरण,--अशा कर्मचाऱ्याच्या किंवा अर्जदाराच्या किंवा कोणत्याही व्यक्तीबरोबरच्या, ग्राहकाबरोबरच्या किंवा अशिलाबरोबरच्या त्याच्या कार्यालयीन अभिलेखामधील किंवा कार्यालयीन दस्तऐवजामधील, अशा कर्मचाऱ्याच्या किंवा अर्जदाराच्या विवाहविषयक स्थितीमध्ये किंवा नामनिर्देशनात कोणताही बदल करणार नाही.

१२. (१) विवाह झाल्यावर-- कलम ६च्या किंवा इतर कोणत्याही कलमांच्या तरतुदींचे पालन करण्याबाबत हयगय करण्याबद्दल किंवा ज्ञापनामध्ये खोटी विधाने करण्याबद्दल शास्ती.

(क) कलम ६ खाली तरतूद केल्याप्रमाणे आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत जर पतीने ज्ञापन सादर करण्यात कसूर केली तर; किंवा

(ख) जर पतीने किंवा पत्नीने अशा ज्ञापनामध्ये कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलासंबंधी खोटे असणारे कोणतेही विधान किंवा प्रतिज्ञापन केले किंवा जे दस्तऐवज किंवा कागद खोटे आहेत असे त्याला, किंवा यथास्थिति, तिला, माहीत असेल किंवा तसे मानण्यास त्याला किंवा तिला कारण असेल असे दस्तऐवज किंवा कागद सादर केले तर,

तो पती, किंवा यथास्थिति, ती पत्नी, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढा द्रव्यदंड होऊ शकणाऱ्या अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती किंवा मंडळ किंवा पक्षकार, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास किंवा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या साध्या कारावासाची शिक्षा होण्यास किंवा दोन्ही शिक्षा होण्यास पात्र ठरेल.

**१३.** या अधिनियमाखालील शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाबद्दलचा कोणताही खटला महानिबंधकाने त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याखेरीज इतर कोणाकडून दाखल करण्यात येणार नाही. खटला भरण्यास मंजुरी.

**१४.** (१) या अधिनियमानुसार ठेवण्यात आलेली नोंदवही, निबंधकाकडे अर्ज केल्यानंतर आणि विहित अशी फी दिल्यानंतर, सर्व वाजवी वेळी जनतेला तपासणीसाठी खुली असेल. नोंदवही लोकांना पाहण्यासाठी खुली असणे आणि उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती देणे.

(२) या संदर्भात अर्ज केल्यानंतर आणि विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर निबंधक, या अधिनियमाखाली ठेवलेल्या नोंदवहीतील कोणत्याही उताऱ्याची प्रत अर्जदाराला देईल.

१९२९ चा १९. **१५.** ज्या विवाहामध्ये पक्षकार अज्ञान असतील किंवा दोघांपैकी एक अज्ञान असेल अशा कोणत्याही विवाहाची नोंदणी बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, १९२९ याच्या तरतुदींस अधीन राहून, कलम ६ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे करता येईल : पक्षकार अज्ञान असेल त्याबाबतीत विवाहाची नोंदणी.

१९२९ चा १९. परंतु, निबंधक विवाहातील पक्षकार सर्वसाधारणपणे ज्याच्या अधिकारितेत राहत असतील अशा स्थानिक पोलीस ठाण्याकडे या विवाहासंबंधी, बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, १९२९ च्या तरतुदींखाली आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी तात्काळ कळवील.

**१६.** जेव्हा निबंधक या अधिनियमाखाली विवाहाची नोंदणी करील तेव्हा, तो त्यानंतर तात्काळ नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत महानिबंधकाकडे पाठवील. निबंधकाने नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत महानिबंधकाकडे पाठविणे.

१८६० चा ४५. **१७.** प्रत्येक निबंधक आणि निबंधकाच्या कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींना अनुलक्षून कृती करत असेल किंवा त्याने तशी कृती करणे अभिप्रेत असेल तेव्हा तो भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. निबंधक लोकसेवक असणे.

या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

१८. या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

१९. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांत विशेषतः पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधी तरतूद करता येईल :--

(क) या अधिनियमाखाली ठेवावयाच्या नोंदवह्या किंवा अभिलेख यांचा नमुना आणि रीत ;

(ख) (एक) विवाह मंडळाच्या नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना ;

(दोन) अर्जदाराने त्या सोबत सादर करावयाची कागदपत्रे ;

(तीन) अशा नोंदणीसाठी व तिच्या नवीकरणासाठी फी ची रक्कम ;

(चार) विवाह मंडळाला द्यावयाच्या नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना आणि अशी नोंदणी ज्या अटी व शर्तीवर द्यावयाची त्या अटी व शर्ती ; आणि

(पाच) महानिबंधकाकडे अपील दाखल करण्याची रीत आणि कार्यपध्दती ;

(ग) (एक) विवाह नोंदणीच्या ज्ञापनाचा नमुना आणि ज्ञापनामध्ये विनिर्दिष्ट करावयाचा साक्षीदारांचा आणि पुरोहिताचा तपशील ;

(दोन) अशा नोंदणीसाठी फी ची रक्कम ;

(तीन) विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(चार) उशिरा नोंदणी केल्याबद्दल शास्तीची रक्कम ;

(घ) या अधिनियमांतर्गत ठेवलेल्या विवाहमंडळाच्या नोंदवहीतून किंवा विवाहाच्या नोंदवहीतून उताऱ्याची प्रत मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना आणि त्यासाठी द्यावयाची फी ;

(ङ) या अधिनियमाखाली ज्यासाठी नियम करता येतील अशी इतर कोणतीही बाब.

(३) प्रथमच नियम करण्यात येत असतील त्याव्यतिरिक्त एरव्ही, या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल आणि अशी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून तो नियम केवळ अशा सुधारित स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९५४ चा ४२. १८७२ चा १५. १९३६ चा ३. **२०.** हा अधिनियम विशेष विवाह अधिनियम, १९५४, भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम, १८७२, किंवा पारशी विवाह आणि घटस्फोट अधिनियम, १९३६ या खाली लागलेल्या विवाहांना लागू होणार नाही. व्यावृत्ती.

१९५४ चा मुंबई ५. **२१.** मुंबई विवाह नोंदणी अधिनियम, १९५३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. अशा प्रकारे निरसन झालेले असले तरी, अशा निरसनापूर्वी उक्त अधिनियमाच्या तरतुदींन्वये निबंधकाकडून नोंदण्यात आलेला कोणताही विवाह किंवा केलेली कोणतीही कार्यवाही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये वैधरीत्या नोंदला आहे किंवा केली आहे, असे समजण्यात येईल. निरसन.

**२२.** या अधिनियमातील तरतुदींची परिणामकारकरीत्या व सुरळीतपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, राज्य शासन वेळोवेळी त्यास योग्य वाटेल असे व या अधिनियमाशी विसंगत नसतील असे निदेश, निबंधक व महानिबंधकांना देईल ; व अशा निदेशांचे पालन करणे, हे निबंधक व महानिबंधकावर बंधनकारक राहील. निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**२३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासनास, **राजपत्रातील,** आदेशाद्वारे अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असा, या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसलेला, निदेश देता येईल. अडचण दूर करण्याचा अधिकार.

(२) हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यावर पोट-कलम (१) अन्वये कोणताही निदेश देता येणार नाही.

---------------